# पोलीस आयुक्त कार्यालय


कक्ष -९ (कनिष्ठ आस्थापना / भरती कक्ष),
नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, डॉ दा.नौ.मार्ग, बृहन्मुंबई – ४००००१
दुरध्वनी क्र. ०२२ २२६२०१११, विस्तारीत क्र. ७०४ ई-मेल– desk9recruitcell.mum@mahapolice.gov.in


जा.क्र.पोआ/कक्ष-९(पोभ)/९(१)/2489/२०२४. दि. 25/०९/२०२४.

## नियुक्ती सुचना क्र.१९

## मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती - २०२१

**विषय :- मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती – २०२१**
**पोलीस शिपाई (चालक) पदावर अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणूकीबाबत.**

**संदर्भ :- १) जा.क्र.पोआ/कक्ष-९(पोभ)/९(१)/१५५६/२०२३, दि. २५/०९/२०२३.**
**२) जा.क्र.पोआ/कक्ष-९(पोभ)/९(१)/५६७/२०२३, दि. ०४/१२/२०२३.**
**३) जा.क्र.पोआ/कक्ष-९(पोभ)/९(१)/१३२१/२०२४, दि. २०/०६/२०२४.**

मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती – २०२१ च्या अंतिम निवड यादीतील उमेदवारांची निवड विविध कारणांनी रद्द झाल्याने त्यांच्या जागी अंतिम प्रतिक्षा यादीतील उमेदवार घेण्यात आले असून, त्यांची कागदपत्र पडताळणी दिनांक २७/०६/२०२४ रोजी घेण्यात आली आहे.

मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती -२०२१ प्रक्रियेतील अंतिम प्रतिक्षा यादीतून अंतिम निवड यादीत समाविष्ट झालेल्या खालील नमूद यादीतील १८ उमेदवारांची समांतर आरक्षणातील प्रमाणपत्रे पडताळणी झाली असल्याने तसेच चारित्र्य पडताळणी होऊन नियुक्तीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना वैद्यकीय चाचणीसह नियुक्ती आदेश देण्यासाठी **दि.३०/०९/२०२४ रोजी सकाळी ०९:३० वाजता पोलीस शल्य चिकित्सक, नागपाडा पोलीस रुग्णालय, भायखळा, मुंबई-४०००0८ येथे प्रशिक्षणासाठी जाण्याच्या तयारीसह उमेदवारांनी हजर रहावे.**

**सदर वैद्यकीय तपासणीमध्ये पात्र ठरल्यानंतरच त्याचदिवशी नियुक्ती आदेश देण्यात येतील, त्यामुळे सदर उमेदवारांनी प्रशिक्षणास जाण्याच्या सर्व तयारीनिशी हजर रहावे. सदर उमेदवार जर नियुक्ती आदेश स्विकारण्यासाठी गैरहजर राहिले तर, गैरहजर उमेदवारांस मुंबई पोलीस शिपाई (चालक) पदावर नियुक्त होण्याचे स्वारस्य नाही असे गृहित धरुन त्याची अंतिम निवड यादीतून निवड कायमस्वरुपी रद्द करण्यात येईल, तसेच त्यांच्या जागी प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नियुक्तीसाठी संधी देण्यात येईल. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

उमेदवारांना नियुक्ती पत्र स्विकारण्याकरिता बोलाविण्यात आले म्हणुन नियुक्तीचा प्राधिकार प्राप्त झाला असे समजण्यात येऊ नये. भरती प्रक्रीयेतील कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरल्यास निवड रद्द करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यास आहेत, याची संबधित उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच खाली नमूद केलेल्या सुचनांचे पालन करण्यात यावे.

**नियुक्तीसाठी येताना न चुकता सोबत आणावयाच्या आवश्यक बाबी :-**

१) भरती ओळखपत्र (मैदानी चाचणी/ लेखी परिक्षेचे)

२) ०४ पासपोर्ट साईज फोटो.

३) आधार कार्ड व पॅन कार्ड.

४) दैनंदिन गरजेच्या वस्तू घेऊन पोलीस प्रशिक्षणाच्या तयारीने न चुकता हजर रहावे.

५) आवेदन अर्जामध्ये नमूद केलेली मुळ कागदपत्रे - (सामाजिक/समांतर आरक्षण सिध्द करण्यास सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेली प्रमाणपत्रे, वयाचा दाखला, शैक्षणिक अर्हता, अधिवास प्रमाणपत्र/रहिवास दाखला, एम.एस.सी.आय.टी. व इतर)

६) शासनाने वेळोवेळी विहीत केलेले लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र, संगणक हाताळणी, नियुक्ती पुर्वीचे हमीपत्र, जन्म तारखेचे हमीपत्र नमुना सोबत जोडला असुन तो सुवाच्छ स्वाक्षरात सोबत भरुन आणावेत.

सोबत नियमीत वापरण्यास लागणारे कपडे, विश्रांतीकरिता साहित्य (दरी, मच्छरदाणी, पांघरुण), ताट-वाटी, तांब्या, ग्लास, दाढीचे साहित्य (पुरुषांकरिता), २ खाकी हाफ पॅन्ट, २ पांढऱ्या बनियान, कॅनव्हास शुज (१ जोडी), खाकी नायलॉन सॉक्स (२ जोडी), २०० पानी वह्या (२), १ पेन, गांधी टोपी, १ लोखंडी बकेट, २ ट्राऊझर (महिलांकरिता), २ पांढरे टी-शर्ट इ. साहित्य सोबत आणावे. सोबत "मेस अॅडव्हान्स ₹. २,०००/- घेऊन यावे."

तसेच संपर्कासाठी दिलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी अद्ययावत ठेवावा. **उमेदवाराने आपल्यासोबत चैनीच्या वस्तू किंवा किंमती वस्तू उदा. सोन्याचे दागिने इ. वस्तू आणू नयेत. अशा वस्तू हरविल्यास किंवा चोरीला गेल्यास कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

**विशेष सुचना :-**

१. भरती आवेदन पत्र नसल्यास अथवा अपूर्ण कागदपत्रे/प्रमाणपत्रे असल्यास नियुक्ती देण्यात येणार नाही. नियुक्तीसाठी दिलेल्या दिनांकाच्यावेळी गैरहजर राहिल्यास पूर्व सूचना न देता निवड रद्द करण्याबाबतची कारवाई करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी व न चुकता हजर रहावे. सदरची पोलीस शिपाई (चालक) पदाची अस्थायी नियुक्ती ही नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीच्या अधिन आहे व सदरहू अटी व शर्ती उमेदवारांस बंधनकारक आहेत.

२. नियुक्तीसाठी बोलविण्यात आलेल्या उमेदवाराने भरती निकषांची/अर्हतेची पुर्तता न केल्याचे आढळुन आल्यास नियुक्ती दिली जाणार नाही, अथवा नियुक्तीनंतर पात्रते विषयी त्रुटी आढळून आल्यास उमेदवाराची निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

पोलीस आयुक्त मुंबई

( नवनाथ ढवळे )
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-२) तथा
सदस्य सचिव, मुंबई पोलीस शिपाई भरती-२०२१

| मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती-2021<br>वैद्यकीय तपासणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी. | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SR NO | APPLICATION NO | NAME | GENDER | DOB | APPLIED CASTE | APPLIED CATEGORY | TOTAL MARKS | SELECTION CASTE | SELECTION CATEGORY |
| 1 | 110601000000560 | SHUBHAMSINGH CHANDUSINGH RAJPUT | M | 16-08-1998 | Open | None | 141 | OPEN | GENERAL |
| 2 | 110601000090538 | SAGAR SUDAM SANAP | M | 22-02-1995 | NT(D) | None | 140 | OPEN | GENERAL |
| 3 | 110601000107367 | SANTOSH ASHOK KAKAD | M | 08-07-1995 | NT(D) | HomeGuard | 140 | OPEN | GENERAL |
| 4 | 110601000060097 | LAXMAN DEVRAM GHUGE | M | 03-03-1996 | NT(D) | None | 140 | OPEN | GENERAL |
| 5 | 110601000072279 | DAULAT ANANDRAO KADAM | M | 27-01-1995 | EWS | None | 139 | EWS | GENERAL |
| 6 | 110601000018165 | SUNIL CHAGAN PATIL | M | 01-02-1995 | EWS | None | 139 | EWS | GENERAL |
| 7 | 110601000113583 | BHAVESH DILIP BHADANE | M | 07-04-2000 | OBC | None | 139 | OBC | GENERAL |
| 8 | 110601000016946 | AJAY BHARAT PATIL | M | 06-11-1996 | NT(C) | Project Affected | 137 | OPEN | Project Affected |
| 9 | 110601000004213 | NILESH VASANT BAGAL | M | 21-05-1983 | Open | Ex Service | 133 | OPEN | Ex Service |
| 10 | 110601000045651 | PRASHANT RAMDAS SHEDGE | M | 10-02-1983 | Open | Ex Service | 132 | OPEN | Ex Service |
| 11 | 110601000055940 | VIJAY GANGARAM KADAM | M | 02-06-1984 | Open | Ex Service | 132 | OPEN | Ex Service |
| 12 | 110601000005651 | SANTOSH MAHADEV SAWANT | M | 07-05-1982 | Open | Ex Service | 131 | OPEN | Ex Service |
| 13 | 110601000011746 | ARVINDSINGH PALSINGH KUSHWAHA | M | 28-01-1984 | Open | Ex Service | 131 | OPEN | Ex Service |
| 14 | 110601000006812 | SWAPNIL SHANKAR JADHAV | M | 24-03-1997 | ST | None | 131 | ST | GENERAL |
| 15 | 110601000055318 | AMOL PRALHAD PARDHI | M | 24-08-1993 | ST | Project Affected | 122 | ST | Project Affected |
| 16 | 220601000001854 | KOMAL SUNIL VARTAK | F | 16-05-2002 | Open | None | 125 | OPEN | FEMALE |
| 17 | 220601000002613 | KRANTI RAJARAM SUVARE | F | 08-02-2000 | OBC | None | 118 | OBC | FEMALE |
| 18 | 220601000001779 | SARITA TEJRAO SARDAR | F | 01-05-2000 | SC | None | 117 | SC | FEMALE |